Impact Factor-7.675 (SJIF)
ISSN-2278-9308


# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed
Multidisciplinary International Research Journal

June-2020

SPECIAL ISSUE-CCXXXI (231)

# *Challenges in the 21st Century & Need of Gandhian Ideology*



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr. V.L.Bhangdia
Principal
Smt.Kesharbai Lahoti
Mahavidyalaya, Amaravati
Dist. Amravati.

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 21 | हिंदी काव्य में गांधीजी की आर्थिक अभ्युदय की संकल्पना डॉ. ज्योति एन. मंत्री | 68 |
| 22 | प्रेमनंद के साहित्य पर गाँधी दर्शनका प्रभाव डॉ. अरुण घोगरे | 74 |
| 23 | महात्मा गांधीजी के आर्थिक विचार प्रा. डॉ. कांतेश्वर जी. ढोबळे | 77 |
| 24 | २१ वी सदी में गाँधी विचारधारा की वैश्वीक महनियता प्रा. डॉ. प्रफुल्ल राऊत | 79 |
| 25 | '२१ वी शताब्दी में गांधी के विचारो की आवश्यकता प्रा. मजितखॉन अमिनखॉन पठाण | 83 |
| 26 | महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार आणि वर्तमान स्थितीतील प्रासंगिकता कु. शीतल बबनराव विधाते | 87 |
| 27 | महात्मा गांधींचे स्वच्छता आणि ग्रामीण विकासातील योगदान भालेराव सुधाकर नारायण | 91 |
| 28 | महात्मा गांधीजीचे सत्याग्रह व अहिंसावादी कार्य प्रा.आर.बी.वाघ | 97 |
| 29 | महात्मा गांधीजीच्या विचारांची प्रासंगितकता प्रा. डॉ. गजानन लिंबाराव सोडनर | 100 |
| 30 | महात्मा गांधीचे स्त्री विषयक विचार प्रा. डॉ. अनिता देशमुख | 105 |
| 31 | महात्मा गांधी और ग्रामीण विकास : एक अध्ययन प्रा.पुरूपोत्तम बांडे | 110 |
| 32 | महात्मा गांधींचा ग्रामीण विकासाबाबत दृष्टीकोण प्रा.डॉ.एस.एन.देशमुख | 114 |
| 33 | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार गजानन अंबादास पाचपुते / कु. पल्लवी अंगेश्वरराव ठाकरे | 118 |
| 34 | खादी व गांधी विचार डॉ. विठ्ठल घिनमिने | 123 |
| 35 | राष्ट्र उभारणी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी गांधी विचारांची आवश्यकता प्रा.डॉ. कविता धनंजय धर्माधिकारी | 128 |
| 36 | महात्मा गांधीजींच्या ग्राम व शेती विकासाबद्दलच्या दृष्टिकोनाचे ऐतिहासिक अध्ययन डॉ.विनोद गौतम सोमकुवर | 132 |
| 37 | "महात्मा गांधीजीचा महिला सक्षमीकरण संदर्भातील दृष्टिकोन : ऐतिहासिक विश्लेषण" प्रा.डॉ.निशांत भिमरावजी शेंडे | 135 |
| 38 | गांधींच्या दृष्टीक्षेपातील चळवळी कु. माया अशोकराव मालेकर | 138 |
| 39 | महात्मा गांधीजींच्या ग्रामीण विकासातील दृष्टीकोन भास्कर रतन खांडवी /प्रा. डॉ. अनिलकुमार जी. प्रसाद | 141 |
| 40 | महात्मा गांधीजींच्या जीवनातील कृषी व ग्रामीण समाजातील योगदान मच्छिंद्रनाथ कैलास आरते / प्रा. डॉ. अनिलकुमार जी. प्रसाद | 145 |
| 41 | राष्ट्रबांधणी आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माणामध्ये गांधीजींच्या विचारांची आवश्यकता प्रा.कल्पना एस.गोडघाटे | 149 |
| 42 | महात्मा गांधी आणि मूल्यव्यवस्था डॉ. किशोर फुले | 153 |
| 43 | गांधीवाद आणि मराठी साहित्य प्रा. दीपक महाजन | 156 |

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**June, 2020**

# गांधींच्या दृष्टीक्षेपातील चळवळी

**कु. माया अशोकराव मालेकर**
संशोधक विद्यार्थी,
राज्यशास्त्र विभाग,श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी हे नाव संपूर्ण जगतात आपल्या तत्वांमुळे सर्वपरिचित आहेत. महात्मा गांधींचे तत्व आचरणात आणणारे अनेक महान लोग जगात आहेत व आपले जीवन सुसंगत पद्धतीने जगत आहेत. अशा या महान आत्म्याचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ राजी पोरबंदर या गावी झाली आणि यांचा खून ३० जानेवारी १९४८ रोजी नथ्थूराम गोडसे या व्यक्तीच्या हातून झाला. मरतांना सुद्धा तोंडून 'हे राम' निघणारे हे महान संत जगाला महान तत्व देवून जातात. त्यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे आहे. गांधींना मिळणाऱ्या अनेक उपाध्या अतुलनीय आहेत. महात्मा ही उपाधी त्यांना रविंद्रनाथ टागोरांनी दिली. 'महात्मा' याचा अर्थ महान अशी आत्मा असा होतो. महात्मा गांधींना लोक प्रेमाने व आदराने बापू म्हणून देखील संबोधित होते. सुभाषचंद्र बोस यांनी इ.स. १९४४ मध्ये अगदी सर्वप्रथम राष्ट्रपिता असे म्हटले. गांधी सविनय, सत्याग्रह संकल्पनेचे जनक होते.

दक्षिण आफ्रिकेत असताना असहकार व अहिंसेच्या तत्वावर भारतीयांना नागरी हक्क मिळवून देण्यासाठी सत्याग्रहाचा उपयोग सर्व प्रथम त्यांनी केला. १९१५ साली भारतात परत आल्यावर जुलमी कर व जमीनदार यांना एकत्रित करून चंपारण मधील शेतकऱ्यांना लढण्यासाठी एकत्र केले. १९२१ साली भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची सुत्रे गांधींनी स्विकारली. या कांग्रेस मार्फत समाजप्रबोधन, गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्वधर्मसमभावची चळवळ देशभरात चालू केली. महात्मा गांधी आजीवन सांप्रदायिकवादाचे विरोधक होते. गांधींनी सर्व धर्म व पंथांचा सखोल अभ्यास केला. तसेच आधार दिला. ते हिंदूबरोबरच मुस्लीमांचे नेते बनले. १९३० ला महात्मा गांधींनी इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात 'दांडी' येथे यशस्वी आंदोलन केले. १९४२ साली याच 'भारत छोडो' आंदोलन संपूर्ण देशभर उभारले. यासाठी त्यांना भारतात आणि दक्षिण आफ्रिकेत अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला.

**विषयाची आवश्यकता :-**

महात्मा गांधींचे संपूर्ण तत्वज्ञान नैतिक व अध्यात्मिक विचारसरणीतून आलेले आहे. एकंदरीत गांधींच्या तत्वज्ञानाचा मुलाधार नैतिक व अध्यात्मिक हाच राहिलेला आहे. गांधींनी सत्य व अहिंसा या दोन तत्वांचा पुरस्कार करून ते तत्व अंगीकारले. त्यांनी स्वयंपूर्णतेचा पुरस्कार करून जीवनभर भारताची प्रगती व विकास करावयाचा असेल तर खेड्यांचा विकास केला पाहिजे. ह्या तत्वावर ते ठाम होते. असे असूनही त्यांच्या जीवनक्रमामध्ये त्यांनी अशा काही चळवळीमध्ये सक्रीयता दर्शविली की त्याचा परिणाम संपूर्ण भारतीय समाजावर झाला. याच अनुषंगाने महात्मा गांधीच्या चळवळीतून हा संशोधनाचा विषय असून आज आधुनिक काळात त्याच्या सखोल अध्ययनाची आवश्यकता आहे.

**चंपारण चळवळ :-**

ब्रिटिश शासनकाळामध्ये शेती व शेतकरी हा विषय शासनाच्या वर्तुळातील न राहता परिघावरील विषय राहिलेला होता. त्यामुळे शेती व शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत दयनीय होती. शेतकरी दुःख दारिद्र्य व दैन्यावस्थेतच होता. याच काळात १९१८ च्या सुमारास गांधी भारतात परतले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा अपेक्षा व आकांक्षा पल्लवीत झाल्या. गांधीजींनी ही शेतकऱ्यांनी परिस्थिती पाहिली व १९१८ साली शेतकऱ्यांचे 'चंपारण' येथे चळवळ उभारली. गांधीजींना पहिले मोठे यश 'चंपारण' चळवळीमध्ये मिळाले. चंपारण व बिहारमधील जमीनदार मुख्यत्वे ब्रिटिशच होते. त्यांनी तेथील शेतकऱ्यांना तीळ उत्पादन सक्तीचे केले. त्यांना योग्य मोबदला मिळत नसे. त्यांच्यावर या अन्यायामुळे कधीकधी उपासमारीची सुद्धा वेळ येत असे. ते गरिबीतच राहत असत. सर्व गावांमध्ये अस्वच्छता व अनारोग्य पसरले होते. लोक रोगांनी ग्रस्त झालेले होते. गांधीजींच्या मनाला अत्यंत वेदना होत होत्या. गावात दारू, अस्पृश्यता, पडदा अशा अनेक समस्या होत्या. याविरूद्ध गांधीजींनी आवाज उठविला. सर्वांना एकत्रित करून त्यांनी समस्यांवर तोडगा काढला. लहान व मोठ्या अनुयायांना एकत्र केले. त्या भागातील सर्व माहिती गोळा करून त्याचा सखोल अभ्यास केला व गावकऱ्यांना विश्वासात घेऊन गावाच्या स्वच्छता व शाळा आणि रूग्णालयांचे बांधकाम केले. गावातील प्रमुखांना एकत्र करून वाईट प्रथा नष्ट करण्यास भाग पाडले. अशीच घटना 'खेडा' या ठिकाणी देखील पहावयास मिळाली.

गांधीजींच्या या कार्याची दखल न घेता त्यांच्या विरूद्ध पोलिसांनी अशांतता निर्माण करण्याच्या गुन्ह्याखाली त्यांना अटक केली व तो भाग सोडून देण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले. गांधीजींच्या सत्कृत्याचा प्रभाव पोलिसांना जाणवला. सर्व गाव एकत्र आले व गांधीजींच्या अटकेचा विरोध केला. लोकांनी अनेक मोर्चे काढले. न्यायालयासमोर व पोलीस स्थानकासमोर लोकांनी आंदोलने केली. शेवटी न्यायालयाला त्यांची मागणी मान्य करावीत लागली. त्यानुसार ठराव मंजुर करण्यात आला. त्या ठरावाप्रमाणे शेतकऱ्यांना जास्त मोबदला आणि स्वतःच्या मतानुसार पीक घेण्याची मोकळीक मिळाली. करातून सुद्धा सुट मिळाली. या आंदोलनादरम्यानच गांधीजींना लोक 'बापू' व 'महात्मा' म्हणून ओळखू लागले. या सर्व आंदोलनादरम्यान बापूंना देशभर प्रसिद्धी मिळाली.

**असहकार चळवळ :-**

गांधीजींनी असहकार व अहिंसा तसेच शांततामय मार्गांचा शस्त्र म्हणून वापर केला. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर लोकांचा क्रोध वाढत गेला. जालियनवाला बाग हत्याकांडात मरण पावलेल्या लोकांचा सहानुभूतीपर भाषणाननंतर त्यांनी लोकांना एक महत्त्वपूर्ण वाट दाखविली. त्यांनी लोकांना पूर्ण स्वराज्याकडे आकर्षित केले. त्यांच्या या कल्पनेत वैयक्तिक, धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य समाविष्ट होते. त्यांनी कधीही हिंसेचा पुरस्कार केला नाही. हिंसा ही पाप आहे हे त्यांनी लोकांना समजावले. ब्रिटिश यांना आपल्या वागण्यातून सहकार न करता त्यांना वागण्याला असहकार दाखवा. ही भावना त्यांनी लोकांना दाखविली. काँग्रेसला देखील हे धोरण पटले. याचा परिपाक म्हणून इ.स. १९२१ डिसेंबर महिन्यात राष्ट्रीय काँग्रेसची सर्व सुत्रे गांधींना देण्यात आली. त्यांच्या नेतृत्वात काँग्रेसची पुनर्बांधणी करण्यात आली. काँग्रेस हा जनसामान्यांचा पक्ष बनला तो फक्त उच्चभ्रूंपर्यंत मर्यादीत राहीला नाही. गांधींनी अहिंसेच्या तत्वाला स्वदेशीची जोड दिली. त्यांनी सर्वांना परदेशी विशेषतः ब्रिटिश वस्तुंचा बहिष्कार करण्याचे आवाहन दिले. ब्रिटिश कपड्यांच्या ऐवजी खादी कपड्यांचा वापर करावा. त्याप्रमाणे प्रत्येक स्त्री-पुरुषाने स्वातंत्र्य लढ्याच्या स्मरणार्थ चरख्यावर सुत कातावे. त्यांचा मुख्य उद्देश शिस्त व स्वावलंबाचे धडे प्रत्येक मनावर गिरवणे हा होता.

ब्रिटिश वस्तुंच्या बहिष्काराबरोबरच ब्रिटिश शैक्षणिक संस्थांना विरोध करणे, सरकारी नोकरीचा त्याग करणे, त्यांनी दिलेल्या पदव्यांचा त्याग करणे, असे जाहीर आवाहन लोकांना त्यांनी केले. अशा या असहकार चळवळीचा सर्वच जनमानसावर परिणाम पडला. पण ही चळवळ जोरदार स्वरूप धारण करताच चौरी चौरा गावातील हिंसक वळणामुळे अचानक बंद पडली व गांधींनी चळवळ स्थगीत केली. १९२२ साली राजकोटाच्या आरोपाखाली गांधींना अटक करण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून राष्ट्रीय काँग्रेसमध्ये फूट दडली व शेवटी काँग्रेसचे दोन गटात विभाजन झाले. हिंदू व मुसलमान यांच्यातील जवळीकता कमी होवून द्वेष वाढला. त्यांनी हे मतभेद दूर करण्याचे अनेक प्रयत्न केले पण शेवटी ते फोल ठरले. त्यांनी यासाठी २१ दिवसांचा उपवास ठेवला पण या निर्णयांना यश मिळाला नाही.

**मीठ व स्वराज्य चळवळ :**

१९२० च्या दशकानंतरचा बराचशा काळ गांधी राजकारणापासून दूर राहिले. त्यांनी या काळात अनेक समस्यांपासून भारताला दूर ठेवण्याचे आपले प्रयत्न सोडले नाही. राजकारणात १९२८ मध्ये ते परत आले. संविधानात सुधारणा करण्यासाठी 'सर जॉयमन' यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. त्या समितीत एकही भारतीय नव्हता. या बाबीचा विरोध म्हणून गांधींनी एक 'स्वराज्य चळवळ' उभारली. ब्रिटिश सरकारने भारताला सार्वभौम दर्जा द्यावा यासाठी ही चळवळ उपयोगी पडली. आपल्या मागण्या पूर्ण केल्या नाही तर संपूर्ण असहकार पुकारून स्वराज्य चळवळ पुढे न्यावी. ही मागणी पुढे आली. पक्षातील काही जणांची मागणी पूर्ण स्वराज्याची होती. पण गांधींनी इंग्रजांना वेळ दिला. त्यांनी वेळ घेवूनही उत्तर दिले नाही. शेवटी मध्ये लाहोर येथे भारताचा ध्वज फडकविण्यात आला व हा दिवस आला. पक्षातील सर्वांनी हा दिवस मनापासून पाळला व आनंद जोमाने वाढविला. मार्च १९३० ला गांधींनी मिठाचा सत्याग्रह केला. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी धरलेला आग्रह असे त्यांचे मत होते. सत्यासाठी धरलेला आग्रह लोकांच्या मनात घर करून गेला. त्याची परिणीती दांडी यात्रेत झाली. अहमदाबादवरून निघालेली दांडी यात्रा ४०० कि.मी. चा प्रवास करून ६ एप्रिलला दांडीला पोहचली. लोक हजारोंच्या संख्येने यात सहभागी झाले. या यात्रेमुळे इंग्रजांचे धाबे दणाणले. त्यांना नेस्तानाबुत करण्याचा मानस भारतीयांचा होता. तो प्रयत्न खऱ्या अर्थाने यशस्वी झाला. यानंतर ब्रिटिश अधिकारी चवताळले व उत्तर म्हणून साठ हजार लोकांना त्यांना तुरूंगवास घडविला. शेवटी गांधी व लॉर्ड एडवर्ड आर्यविन यांच्या नेतृत्वाखालील वाटाघाटीत एक ठराव मंजुर करण्यात आला व लोकांना सोडण्यात आले.

**निष्कर्ष :-**

गांधीजींनी चंपारण आणि खेडा चळवळीच्या अनुषंगाने गावकऱ्यांना विश्वासात घेवून स्वच्छतेचे धडे दिले. शेतकऱ्यांचा हिताचा विचार करीत असताना ते दुष्काळापर्यंत जाणार नाही याची दक्षता त्यांनी चळवळीच्या माध्यमातून घेतली. असहकार व अहिंसा अशांततेचा विरोध करत स्वराज्याची संकल्पना दृढ केली. तसेच त्यांनी चळवळीच्या माध्यमातून मांडत असताना स्वावलंबाचे महत्त्व

ISSN : 2278-9308
June, 2020

लोकांच्या मनावर बिंबविले. स्वराज्य मिळविणे हा आपला हक्क आहे. हे भारतीयांना ठासून सांगत असताना यशस्वी प्रयत्न तुरूंगात असताना त्यांनी केले. गांधींच्या विचारातून चळवळींच्या माध्यमाने अनेक प्रकारचे मतभेद दूर झाले असे दिसते.

**उद्देश :-**

१) चळवळींच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देणे.
२) समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करणे.
३) सत्य व अहिंसेची मूल्ये प्रस्थापित करणे.
४) भारतीय समजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे.
५) समाजातील विविध वर्गवारी नष्ट करणे.
६) राष्ट्रीय एकात्मता वृद्धींगत करणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत विषय संशोधनासाठी संशोधकाने दुय्यम स्त्रोतांचा वापर केला. त्यासाठी मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट, संदर्भग्रंथे, नियतकालिके, पुस्तके इत्यादी स्त्रोतांचा वापर केला.

**संदर्भग्रंथ सूची :-**

१) प्रा. सोनुने यशवंत, 'मंथन', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
२) सिंह मनोज कुमार, कुमार आशुतोष, 'महात्मा गांधी एक अवलोकन', के.के. पब्लिकेशन, नवी दिल्ली.
३) सुमन श्री रामनाथ, 'समाज सुधार समाचार और समाधान', गांधी साहित्य प्रकाशन, इलाहाबाद.
४) गांधीजी, 'हिंदी स्वराज्य', नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.
५) गांधीजी, 'सर्वोदय', नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.
६) इंटरनेट - https://mr.wikipedia.org/wiki/महात्मा गांधी.